# कलम ४ (१) (ख) (बारा) नमुना “क” (कार्यासन-१६)

विधि व न्याय विभागाच्या नियंत्रणाखालील श्री साईबाबा संस्थान, शिर्डी, श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर, प्रभादेवी, मुंबई या कार्यालयातील अनुदान वाटपाच्या कार्यक्रमाची कार्यपद्धती -----------

कार्यक्रमाचे नांव

लाभार्थीच्या पात्रतासंबंधीच्या अटी व शर्ती

लाभ मिळण्यासाठीच्या अटी

लाभ मिळण्यासाठीची कार्यपद्धती

पात्रता ठरविण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र

कार्यक्रमामध्ये मिळणाऱ्या लाभाची विस्तृत माहिती

अनुदान वाटपाची कार्यपद्धती

सक्षम अधिकाऱ्याचे पदनाम

विनंती अर्जासोबत लागणारे शुल्क

इतर शुल्क

विनंती अर्जाचा नमुना

सोबत जोडणे आवश्यक आलेल्या कागदपत्रांची यादी (दस्तऐवज/दाखले)

जोड कागदपत्रांचा नमुना

कार्यपद्धतीसंदर्भात तक्रार निवारणासाठी संबंधित अधिकाऱ्याचे पदनाम

तपशीलवार व प्रत्येक स्तरावर उपलब्ध निधी (उदा.जिल्हा पातळी, तालुका पातळी, गाव पातळी)

लाभार्थीची यादी खालील नमुन्यात.

**टीप :- अनुदान समितीकडून वितरीत करण्यात येते. श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास व्यवस्थापन समिती, प्रभादेवी, मुंबई यांच्याबाबतीत सविस्तर माहितीकरिता Website :-** www.siddhivinayak.org **आणि श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांच्याबाबतीत Website :-** www.shrisaibabasansthan.org **यावर कृपया अवलोकन करावे.**

## कलम ४ (१) (ख) (बारा) नमुना “ख” (कार्यासन १६)

विधि व न्याय विभागाच्या नियंत्रणाखालील समित्यांच्या कार्यालयामार्फत अनुदान वितरीत करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांतर्गत लाभार्थींची विस्तृत माहिती प्रकाशित करणे.

**योजना/कार्यक्रमाचे नांव :-**

| अ.क्र. | लाभार्थीचे नांव पत्ता | अनुदान/लाभ याची रक्कम/स्वरुप व संपूर्ण तपशील | निवड पात्रतेचे निकष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**<u>टीप</u> :- अनुदान समितीकडून वितरीत करण्यात येते. तसेच लाभार्थीची संख्या अत्याधिक असल्यामुळे यादी सोबत देणे शक्य होणार नाही. श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास व्यवस्थापन समिती, प्रभादेवी, मुंबई यांच्याबाबतीत सविस्तर माहितीकरिता Website :-** www.siddhivinayak.org **आणि श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांच्याबाबतीत Website :-** www.shrisaibabasansthan.org **यावर कृपया अवलोकन करावे.**

## कलम ४ (१) (ख) (बारा) नमुना “क” (कार्यासन-१७)

विधि व न्याय विभाग, मंत्रालय येथील कार्यासन सतरा कार्यालयातील अनुदान वाटपाच्या कार्यक्रमाची कार्यपद्धती प्रकाशित करणे.

कार्यक्रमाचे नांव

लाभार्थीच्या पात्रतासंबंधीच्या अटी व शर्ती }

लाभ मिळण्यासाठीच्या अटी }

लाभ मिळण्यासाठीची कार्यपद्धती }

पात्रता ठरविण्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र }

कार्यक्रमामध्ये मिळणाऱ्या लाभाची विस्तृत माहिती }

अनुदान वाटपाची कार्यपद्धती }

सक्षम अधिकाऱ्याचे पदनाम }

विनंती अर्जासोबत लागणारे शुल्क }

इतर शुल्क }

विनंती अर्जाचा नमुना

सोबत जोडणे आवश्यक आलेल्या कागदपत्रांची यादी (दस्तऐवज/दाखले)

जोड कागदपत्रांचा नमुना

कार्यपद्धतीसंदर्भात तक्रार निवारणासाठी संबंधित अधिकाऱ्याचे पदनाम

**२०२०-२१ आर्थिक वर्षात विविध लेखाशीर्षाखाली संबंधित मुंबई महानगर दंडाधिकारी व जिल्हा न्यायालयांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा तपशील**

| अ. क्र | लेखाशीर्ष | सन २०२०-२०२१ चा तपशील | मंजूर तरतूद | उपलब्ध तरतूद | लाभार्थींची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | जे-३-३६०४ | स्थानिक संस्थांना सहायक अनुदान-स्थानिक संस्था व नगर पालिका अधिनियम इतर अधिनियमाखालील प्रकरणात सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात दंडरुपाने सरकारी खजिन्यात जमा झालेल्या रकमेतून ५० टक्के आस्थापना खर्च वजा जाता उर्वरित रक्कम सहायक अनुदान स्वरुपात महानगर दंडाधिकारी मुंबई व जिल्हा न्यायालयांना संबंधित स्थानिक संस्थांना वितरीत करण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. नस्ती क्र.(जीडीए १४२०/९९/२०/का.१७) | ७,३२,६०,००० | ३,६६,३०,००० | मुंबई महानगर दंडाधिकारी तसेच ३१ जल्हा व सत्र न्यायालये |
| २ | जे-१ २०१४ न्यायदान | जिल्हा न्यायालयांना ग्रंथालय अनुदान-जिल्हा व तालुक्यातील विधिज्ञ ग्रंथालयास सहायक अनुदान स्वरुपात निधि उपलब्ध करुन देण्यात येते.नस्ती क्र.(जीडीए १५२०/१००/२०/का.१७) | ४,९५,००० | २,४८,००० | १२ जिल्हा व तालुका विधिज्ञ ग्रंथालये |
| ३ | जे-१ २०१४ न्यायदान | जनावरांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध व निर्धनपेटी-मुंबई महानगर दंडाधिकारी मुंबई **कार्यालयामार्फत** या संस्थेकडे दंड रुपाने जमा झालेल्या रकमेपैकी ८० टक्के रक्कम मुंबई महानगर दंडाधिकारी कार्यालयामार्फत सहायक अनुदान म्हणून देण्यात येते. नस्ती क्र.(जीडीए १६२०/९८/२०/का.१५) | ६,००,००० | ६०,००० | प्राणी क्लेश संस्था, मुंबई |

**सहायक अनुदानास मंजूरी**

स्थानिक संस्था नगरपालिका अधिनियम व इतर अधिनियमाखालील प्रकरणात सन २०१९-२० या आर्थिक वर्षात दंडरुपाने मिळालेल्या व सरकारी खजिन्यात जमा झालेल्या रकमेतून सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात देय असलेल्या सहायक अनुदानाच्या वाटपास मंजुरी देणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्रमांक : जीडीए १४२०/(१९/२०)/कार्या-१७.

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई ४०० ०३२.

दिनांक :-०८ मार्च ,२०२१.

संदर्भ:- शा.नि. क्र. जीडीए- ५,२०१२/(प्र. क्र.९२/१२)/का.१७, दि. २९.०३.२०१४.

**प्रस्तावना :-**

स्थानिक संस्था, नगरपालिका अधिनियम व इतर अधिनियमाखाली दंड रुपाने जमा झालेल्या रकमांमधून संदर्भाधीन शासन निर्णयानुसार ५० टक्के रक्कम आस्थापना खर्च वजा जाता उर्वरित ५० टक्के रक्कम मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई व सर्व जिल्हा न्यायालयांमार्फत संबंधित नगरपालिका व पंचायतराज संस्था यांना **"३६०४- स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या अभिहस्तांकीत रकमा देणे"**या उद्दिष्टाकरिता वितरीत करण्यात येते. जिल्हा न्यायालयांकडून सद्यस्थितीत प्राप्त प्रस्तावानुसार सन २०१९-२० या वित्तिय वर्षात दंड रुपाने मिळालेल्या व सरकारी खजिन्यात जमा केलेल्या रक्कमेमधून ५०% आस्थापना खर्च अधिक इतर भत्ते वजा करुन उर्वरित रु. ६,५५,६९,६८१/-(रुपये सहा कोटी पंचावन्न लक्ष एकोणसत्तर हजार सहाशे एक्याएशी फक्त) इतकी रक्कम सहायक अनुदान म्हणून सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात मुख्य महानगर दंडाधिकारी तसेच जिल्हा व सत्र न्यायाधीश यांना उपरोक्त उद्दिष्टासाठी अनुज्ञेय आहे.

**शासन निर्णय :-**

सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकान्वये अर्थसंकल्पीत तरतूदीपैकी ५० टक्के मर्यादेत उपलब्ध असलेले रु.३,६६,३०,०००/-(रू. तीन कोटी सहासष्ट लक्ष तीस हजार फक्त) इतके सहायक अनुदान " ३६०४, स्थानिक संस्था व पंचायतराज संस्था यांना नुकसान भरपाईच्या अभिहस्तांकित रकमा देणे "या उद्दिष्टासाठी सोबतच्या "विवरणपत्र-अ"मधील स्तंभ ६ मध्ये नमूद केल्यानुसार मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई व संबंधित जिल्हा व सत्र न्यायाधीश यांना सन २०२०-२१ या वित्तीय वर्षासाठी वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. मुख्य महानगर दंडाधिकारी, जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना वरील सहायक अनुदानाची रक्कम अदा करावी व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर रक्कम विनियोजित करावी.

३. मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम १४९, परिशिष्ट २२ मधील परिशिष्ट-३ अनुसार शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेल्या सहायक अनुदानांसंबंधीचे सर्व कागदपत्र व हिशेब महालेखापाल (लेखा परीक्षा)- एक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व महालेखापाल (लेखा परीक्षा)-दोन, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी तपासणीसाठी मागविल्यास ते सादर करावेत.

४. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक जीआयएन-११७०/२३०/७०/सात, दि. ५ डिसेंबर, १९७० यामधील जोडपत्रातील परिच्छेद (३) व (१) यातील तरतुदींना अनुसरुन शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्रमांक पी-३६१/२३६६/एच/(२), दि. २९ जुलै, १९७२ मध्ये दर्शविलेल्या संवितरण अधिकाऱ्यांनी म्हणजेच जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी संबंधित संस्थांना सहाय्यक अनुदानाची रक्कम अदा करावी.

५. हा खर्च, **"प्रधान लेखाशिर्ष- मागणी क्र.जे-३, ३६०४- स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे, दत्तमत २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकीत रकमा देणे,(००) (०१) शासनाकडे जमा केलेल्या दंडाद्वारे मिळालेल्या महसुलातून स्थानिक संस्थांना सहायक अनुदान (संकेतांक ३६०४ ०२७२) (अनिवार्य) ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेतर)"** या लेखाशीर्षाखाली सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात खर्ची टाकण्यात यावा.

६. या सहाय्यक अनुदानाची रक्कम खर्च केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधितांनी त्वरीत पाठविणे बंधनकारक आहे.

७. हा शासन निर्णय, वित्तिय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ (सुधारित), भाग पहिला, उपविभाग-एक, अनुक्रमांक २७, नियम क्रमांक १४९ अनुसार मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Jiwane
08/03/2021

**सोबत :- सहायक अनुदान वितरणाचे विवरणपत्र.**

**(नितीन वि. जिवने)**
**विधि सल्लागार-नि सहसचिव**

प्रत:- १. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.

२. सर्व जिल्हा व सत्र न्यायाधीश (विवरणपत्रानुसार)-अमरावती, बुलढाणा, अकोला, यवतमाळ, औरंगाबाद, जालना, बीड, नांदेड, लातूर, जळगाव, पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, वर्धा, भंडारा, चंद्रपूर,गडचिरोली, गोंदिया.

३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी. (जिल्हा व सत्र न्यायालयांमार्फत)- अमरावती, बुलढाणा, अकोला, यवतमाळ, औरंगाबाद, जालना, बीड, नांदेड, लातूर, जळगाव, पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया.

४. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई (२ प्रती)

५. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर (२ प्रती)

६. महालेखापाल, (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई (२ प्रती)

७. महालेखापाल, (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर (२ प्रती)

८. सहायक महालेखापाल अंतर्गत निरीक्षण कक्ष, महालेखापालांचे कार्यालय, मुंबई

९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई (२ प्रती)

१०. अवर सचिव, वित्त विभाग (अर्थसंकल्प -११), मंत्रालय, मुंबई

११. कक्ष अधिकारी/ कार्यासन २३,२४ व २५, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई

१२. अवर सचिव/ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१३. निवड नस्ती/कार्यासन १७, संग्रहार्थ.

# " विवरणपत्र "

**शासन निर्णय क्रमांक: जीडीए -१४२०/(९९/२०/का-१७, दि. ०८ मार्च, २०[illegible] चे विवरणपत्र.**

**सहायक** अनुदानास दि.१/०४/२०१९ ते दि.३१/०३/२०२० या कालावधीत नगरपालिका कायदा व इतर काही अधिनियमाखाली दंडाद्वारे जमा करण्यात आलेल्या रकमेतून सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात स्थानिक संस्था व पंचायतराज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा (परतावा असल्यास परतावा) आणि ५०% आस्थापना खर्च अधिक इतर भत्ते वजा करुन देय असलेल्या रकमेचे वाटप करण्यात यावयाच्या रकमा दर्शविणारे जिल्हानिहाय विवरणपत्र( मुख्य लेखाशिर्ष ३६०४ )

| अ. क्र. | जिल्हा व सत्र न्यायालये | सन २०१९-२० या आर्थिक वर्षात दंड रूपाने जमा रक्कम | ५०% आस्थापना खर्च + इतर भत्ते यांच्या वजाती (रुपये) | वितरीत करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मु.महानगर दंडाधिकारी,मुंबई | ११,१८,१७,८३२/- | ५,५९,०८,९१६/- | २,६९,६९,२३५/- |
| २ | अमरावती | २,४५,५००/- | १,२२,७५०/- | १,२२,७५०/- |
| ३ | बुलढाणा | २,८८,०००/- | १,४४,०००/- | १,४४,०००/- |
| ४ | अकोला | ९४,७००/- | ४७,३५०/- | ४७,३५०/- |
| ५ | यवतमाळ | ९०,८००/- | ४५,४००/- | ४५,४००/- |
| ६ | औरंगाबाद | ६,४९,९५०/- | ३,२४,९७५/- | ३,२४,९७५/- |
| ७ | जालना | २८,२००/- | १४,१००/- | १४,१००/- |
| ८ | बीड | १,८१,२००/- | ९०,६००/- | ९०,६००/- |
| ९ | नांदेड | ८,६४,४००/- | ४,३२,२००/- | ४,३२,२००/- |
| १० | लातूर | २,९१,५३०/- | १,४५,७६५/- | १,४५,७६५/- |
| ११ | जळगाव | ७,४४,७४२/- | ३,७२,३७१/- | ३,७२,३७१/- |
| १२ | पुणे | ३९,७७,२३४/- | २३,८३,१५४/- | २३,८३,१५४/- |
| १३ | सांगली | ९,९६,०००/- | ४,९८,०००/- | ४,९८,०००/- |
| १४ | कोल्हापूर | २९,६३,३००/- | १४,८१,६५०/- | १४,८१,६५०/- |
| १५ | सोलापूर | ५,८९,७३०/- | २,९४,८६५/- | २,९४,८६५/- |
| १६ | ठाणे | २९,७५,५५०/- | १४,८७,७७५/- | १४,८७,७७५/- |
| १७ | सिंधुदुर्ग | ३४,७५०/- | १७,३७५/- | १७,३७५/- |
| १८ | रत्नागिरी | १,२१,४५०/- | ६०,७२५/- | ६०,७२५/- |
| १९ | वर्धा | १,०३,६३०/- | ५१,८१५/- | ५१,८१५/- |
| २० | भंडारा | १००/- | ५०/- | ५०/- |
| २१ | चंद्रपूर | १८,८९,२००/- | ९,४४,६००/- | ९,४४,६००/- |
| २२ | गडचिरोली | १३,१६,१९९/- | ६,५८,०९५/- | ६,५८,०९५/- |
| २३ | गोंदिया | ८६,३००/- | ४३,१५०/- | ४३,१५०/- |
|  | एकूण | १३,०३,५०,२९७/- | ६,५५,६९,६८१/- | ३,६६,३०,०००/- |

टीप:- . अ.क्र.१२ पुणे- रु.२३,८३,१५४/- इतकी रक्कम एकूण जमा झालेल्या रकमेतून ५०% कपात न करता १००% अनुज्ञेय आहे.

**सहायक अनुदानास मंजुरी**
स्थानिक संस्था नगरपालिका अधिनियम व इतर अधिनियमाखालील प्रकरणात सन २०१९-२० या आर्थिक वर्षात दंडरुपाने मिळालेल्या व सरकारी खजिन्यात जमा झालेल्या रकमेतून सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात देय असलेल्या सहायक अनुदानाच्या वाटपास मंजुरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक : जीडीए -१४२०/(प्र.क्र.९९/२०)/का.१७**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.
**दिनांक :- २४ मार्च,२०२१.**

**वाचा :- या विभागाचा समक्रमांकाचा दि.०८.०३.२०२१ रोजीचा शासन निर्णय.**

**शासन शुध्दीपत्रक :-**

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय दि. ०८.०३.२०२१ मधील परिच्छेद क्र.७ मध्ये " हा शासन निर्णय, वित्तिय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ (सुधारित), भाग पहिला, उपविभाग-एक, अनुक्रमांक २७, नियम क्रमांक १४९ अनुसार मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच निर्गमित करण्यात येत आहे."

**या ऐवजी**

" हा शासन निर्णय, वित्तिय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ (सुधारित), भाग पहिला, उपविभाग-एक, अनुक्रमांक २७, नियम क्रमांक १४९ अनुसार मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १६८/२०२१/व्यय-५,दिनांक १६ फेब्रुवारी २०२१ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे ." असे वाचण्यात यावे."

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

24/03/2021
(नितीन वि.जिवने)
विधि सल्लागार-नि-सह सचिव

प्रत:- १. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.
२. सर्व जिल्हा व सत्र न्यायाधीश (विवरणपत्रानुसार)-अमरावती, बुलढाणा, अकोला, यवतमाळ, औरंगाबाद, जालना, बीड, नांदेड, लातूर, जळगाव, पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, वर्धा, भंडारा, चंद्रपूर,गडचिरोली, गोंदिया.

३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी. (जिल्हा व सत्र न्यायालयांमार्फत)- अमरावती, बुलढाणा, अकोला, यवतमाळ, औरंगाबाद, जालना, बीड, नांदेड, लातूर, जळगाव, पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया.

४. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई (२ प्रती)

५. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर (२ प्रती)

६. महालेखापाल, (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई (२ प्रती)

७. महालेखापाल, (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर (२ प्रती)

८. सहायक महालेखापाल अंतर्गत निरीक्षण कक्ष, महालेखापालांचे कार्यालय, मुंबई

९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई (२ प्रती)

१०. अवर सचिव, वित्त विभाग (अर्थसंकल्प -११), मंत्रालय, मुंबई

११. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय ५), मंत्रालय, मुंबई

१२.कक्ष अधिकारी/ कार्यासन २३,२४ व २५, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई

१३. अवर सचिव/ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१४. निवंड नस्ती/कार्यासन १७, संग्रहार्थ.

महाराष्ट्र शासन

क्र. जीडीए १५२०/(१००/२०)/का-१७
विधि व न्याय विभाग, मंत्रालय
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई ४०० ०३२.
दिनांक: -०३ मार्च, २०२१.

विषय:- महाराष्ट्रातील जिल्हा व तालुका विधिज्ञ ग्रंथालयांना सन २०२०-२१ या वित्तीय वर्षासाठी अनुदानाचे वाटप करण्याबाबत.

ज्ञापन :-

या विभागामार्फत "मागणी क्र.जे.१, २०१४-न्यायदान (दत्तमत) १०५, जिल्हा व सत्र न्यायालये, (०२) (०१) जिल्हा व सत्र न्यायाधीश, (२०१४०१७२), ३१ सहायक अनुदान" या प्रधान लेखाशिर्षाखाली जिल्हा व तालुका विधिज्ञ ग्रंथालयांना सहाय्यक अनुदानाचे वाटप करण्यात येते.

२. सन २०२०-२१ या वित्तीय वर्षासाठी उपरोक्त लेखाशीर्षाखाली रु. ४,९५,०००/- (रुपये चार लक्ष पंच्याण्णव हजार फक्त) इतके अनुदान अर्थसंकल्पाद्वारे मंजूर झाले आहे. मात्र, वितरणासाठी एकूण रु.४९,०००/- इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तदनुसार रु.४९,०००/- (रुपये एकोणपन्नास हजार फक्त) एवढे सहायक अनुदान सोबतच्या विवरणपत्र "अ" मधील चार जिल्हा व तालुका विधिज्ञ ग्रंथालयांना सुपूर्द करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. सदर अनुदानाची रक्कम तात्काळ खर्ची टाकण्यात यावी.

३. सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये दिलेल्या तपशीलानुसार चार जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी संबंधीत विधिज्ञ ग्रंथालयांना आर्थिक सहाय्य द्यावे व ते आर्थिक सहाय्य तालुका विधिज्ञ ग्रंथालयांनी वापरल्याबाबतचे विनियोजन प्रमाणपत्र त्वरीत महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- एक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-दोन, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना आणि विधि व न्याय विभागास वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक सीआरओ-७१६३/११२८७/सात, दिनांक २ नोव्हेंबर, १९६४ व क्र. सीआरओ-७१६५/१०६५२/सात, दिनांक २३ जून, १९६५ मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये व दिनांकास सादर करावे. मुंबई वित्तीय नियम पुस्तिका, १९५९ च्यां परिशिष्ट २२ मधील आवश्यकतांचे अनुपालन करणे आवश्यक आहे.

४. या बाबीवरील खर्च मागणी क्रमांक जे-१, २०१४, न्यायदान (दत्तमत) १०५, दिवाणी व सत्र न्यायालय, (०२) (०१) जिल्हा व सत्र न्यायाधीश, (२०१४०१७२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (अनिवार्य) मध्ये खर्ची टाकण्यात यावा आणि त्यासाठी मंजूर केलेल्या वित्तीय वर्ष २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा.

५. सदर ज्ञापन शासन निर्णय, वित्त विभाग, दि. १७.०४.२०१५ अन्वये सुधारित वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग " एक " मधील अ.क्र.२७ नियम क्र.१४९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारांतर्गत निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सहपत्र:- विवरणपत्र "अ"

(नितीन वि. जिवने)
विधि सल्लागार-नि. सहसचिव

प्रत,

१. महाप्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई
२. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, सिंधुदुर्ग
३. जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, सिंधुदुर्ग (प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयांमार्फत)
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १, महाराष्ट्र राज्य, मुंबई (२ प्रती)
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) २, महाराष्ट्र राज्य, नागपूर (२ प्रती)
६. महालेखापाल (लेखापरीक्षा)१, महाराष्ट्र राज्य, मुंबई (२ प्रती)
७. महालेखापाल (लेखापरीक्षा)२, महाराष्ट्र राज्य, नागपूर (२ प्रती)
८. वित्त विभाग (अर्थसंकल्प-११) मंत्रालय, मुंबई ३२.
९. कक्ष अधिकारी, कार्यासन-२३, २४ व २५, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१०. निवड नस्ती/कार्यासन -१७ संग्रहार्थ

Issued
05.03.2021

ज्ञापन क्र.जीडीए-१५२०/(१००/२०)/क्रा.१७, दि. ०३.०३.२०२१ नुसार जिल्हा व तालुका विधिज्ञ ग्रंथालयांना सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या सहायक अनुदानासंबंधीचे विवरणपत्र "अ"

| | जिल्हा/ जिल्हा विधिज्ञ ग्रंथालयाचे ठिकाण व डी.डी.ओ. क्र. | जिल्हा विधिज्ञ ग्रंथालयास मंजूर केलेली रक्कम | तालुका विधिज्ञ ग्रंथालयाचे ठिकाण | तालुका विधिज्ञ ग्रंथालयास मंजूर केलेली रक्कम | जिल्हा व तालुका विधिज्ञ ग्रंथालय यांना मिळून मंजूर केलेली रक्कम (रु.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | औरंगाबाद (१२) | ५,००० | वैजापूर | ९०० | १२,२५० | |
| | | | गंगापूर | ९०० | | |
| | | | कन्नड | ९०० | | |
| | | | पैठण | ९५० | | |
| | | | सिल्लोड | ९०० | | |
| | | | सोयगांव | ९०० | | |
| | | | फुलंब्री | ९०० | | |
| | | | खुलताबाद | ९०० | | |
| | | | | | | |
| | जालना (१३) | ६,००० | अंबड | १,२५० | १२,२५० | |
| | | | भोकरदन | १,००० | | |
| | | | परतूर | १,००० | | |
| | | | जाफ्राबाद | १,००० | | |
| | | | मंठा | १,००० | | |
| | | | घनसावंगे | १,००० | | |
| | | | | | | |
| | उस्मानाबाद (१७) | ५,२५० | कळंब | १,००० | १२,२५० | |
| | | | उमरगा | १,००० | | |
| | | | परांडा | १,००० | | |
| | | | तुळजापूर | १,००० | | |
| | | | भूम | १,००० | | |
| | | | लोहारा | १,००० | | |
| | | | वाशी | १,००० | | |
| | | | | | | |
| | सिंधुदुर्ग (२९) | ५,२५० | देवगड | १,००० | १२,२५० | |
| | | | कणकवली | १,००० | | |
| | | | मालवण | १,००० | | |
| | | | वेंगुर्ला | १,००० | | |
| | | | कुडाळ | १,००० | | |
| | | | सावंतवाडी | १,००० | | |
| | | | दोडामार्ग | १,००० | | |
| | एकूण | २१,५०० | | २७,५०० | ४९,००० | |

625

# महाराष्ट्र शासन

क्र. जीडीए-१६२०/प्र.क्र.९८/२०/का-१७
विधि व न्याय विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- ०७ जानेवारी, २०२१.

विषय:- प्राणी क्लेश संरक्षक संस्था, मुंबई यांना सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात सहायक अनुदान मंजूर करण्याबाबत.

संदर्भ:- मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांचे पत्र जा.क्र.८७३/२०२०, दि.०४.१२.२०२०.

ज्ञापन :-

प्राणी क्लेश संरक्षक संस्था, मुंबई यांच्याकडून प्राणी क्लेश संरक्षक कायदा, १९६० अन्वये माहे जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२० या कॅलेंडर वर्षात दंड रुपाने व जमानतपत्र समपहरणाद्वारे एकूण रु.१,६०,२००/-(रुपये एक लक्ष साठ हजार दोनशे फक्त) इतकी रक्कम शासनाच्या खजिन्यात जमा झालेली आहे. या जमा झालेल्या रकमेपैकी २०% इतकी रक्कम रु.३२,०४०/- (रुपये बत्तीस हजार चाळीस फक्त) आस्थापना खर्च म्हणून वजा करुन उरलेली ८०% रक्कम रु.१,२८,१६०/- (रुपये एक लक्ष अठ्ठावीस हजार एकशे साठ फक्त) एवढे सहायक अनुदान मुख्य महानगर दंडाधिकारी यांना "मागणी क्र.जे.१, २०१४- न्यायदान(दत्तमत)-८०० इतर खर्च(००)(०१) जनावरांस निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध व निर्धन पेटी (२०१४ ०३२३) ३१- सहायक अनुदान" या लेखाशिर्षाखाली अनुज्ञेय आहे.

२. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात लेखाशीर्ष "मागणी क्र.जे.१, २०१४-न्यायदान(दत्तमत)-८०० इतर खर्च (००)(०१) जनावरांस निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध व निर्धन पेटी" निधी संकेतांक क्रमांक (२०१४ ०३२३) ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) अंतर्गत एकूण रु.६,००,०००/- इतक्या रकमेची अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. मात्र, वित्त विभागाने त्यापैकी रु.६०,०००/- (१०%) इतका निधी वितरणासाठी उपलब्ध करुन दिला आहे. त्यानुसार उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत रु.६०,०००/-(रुपये साठ हजार फक्त) इतके सहायक अनुदान या शासन ज्ञापनाद्वारे विहित उद्दिष्टाकरिता मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांना वितरित करण्यात येत आहे.

४. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या अनुमतीने कोषागाराकडील हिशेबानुसार मेळ बसविलेल्या प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र या विभागास पाठविण्यात यावे.

५. "प्राणी क्लेश संरक्षक संस्था,मुंबई" यांनी सहायक अनुदान वापरल्याबाबतचे विनियोजन प्रमाणपत्र त्वरीत महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)एक महाराष्ट्र, मुंबई आणि विधि व न्याय विभागास वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक सीआयए-७१६३/११२८७/सात, दि.२/११/१९६४ व क्रमांक सीआयए-७१६५/१०६५२/सात, दि.२३.०६.१९६५ मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये व दिनांकाला सादर करावे. मुंबई वित्तीय नियम पुस्तिका, १९५९च्या परिशिष्ट२२मधील आवश्यकतांचे अनुशीलन करणे आवश्यक आहे.

६.	यासाठी होणारा खर्च "मागणी क्र.जे-१,२०१४- न्यायदान, (दत्तमत)-८०० इतर खर्च (००) (०१) जनावरांस निदर्यतेने वागविण्यास प्रतिबंध व निर्धन पेटी निधी"( २०१४ ०३२३) ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर)", या लेखाशिर्षाखाली व सन २०२०-२१ या वित्तीय वर्षासाठी मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

७.-	सहायक अनुदानाची रक्कम खर्च केल्याबाबतचे प्रमाणपत्र पाठविणे आवश्यक आहे.

८.	हे ज्ञापन वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.७१०/२०२०/व्यय-५, दि.३०.१२.२०२० अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर अनुदानासाठी प्रबंधक, मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, मुंबई यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सदर अनुदानासाठी मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(कां.रा.पिळणकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
२. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.
३. सचिव व कोषाध्यक्ष, प्राणी क्लेश संरक्षक संस्था, डॉ.एस.एस.राव मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१२.
४. पोलीस आयुक्त, मुंबई
५. संचालक, पशु वैद्यकीय सेवा, महाराष्ट्र राज्य, डॉ.एस.एस.राव मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१२
६. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (२प्रती), (मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्यामार्फत)
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई (२ प्रती)
१०. कार्यासन अधिकारी/कार्यासन १३,२३,२४,२५ विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
११. वित्त विभाग (व्यय ५), मंत्रालय, मुंबई३२
१२. निवड नस्ती / कार्यासन १७.

निर्गमित
७/१/२०२१

E:\२०१४-प्राणी क्लेश संरक्षण संस्था २०२०-२१-सहायक अनुदान.docx